महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/गणवेष/न.क्र.१०/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

## प्रशासकीय परिपत्रक क्र. १२९ दिनांक ०२ / ११ / २००७

विषय : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित अंतर्गत सर्व उपकेंद्रामध्ये कार्यरत असणाऱ्या यंत्रचालकांना 'रेनसूट' व 'गमबूट' पुरविणेबाबत.

संदर्भ : १) संहिताबध्द सर्व साधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.६२ दि.०५.०७.२००६

.......

संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ अनुसार पूर्वीच्या म.रा.वि.मंडळातील ठराविक कर्मचाऱ्यांना 'रेनकोट' व 'गमबूट' पुरविले जात होते. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.६२ दिनांक ०५.०७.२००६ अन्वये कंपनीतील सर्व 'रेनकोट' मिळण्यास पात्र कर्मचाऱ्यांना 'रेनसूट' खरेदी करुन त्याची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र ठरविण्यात आलेले आहे.

२. पावसाळयामध्ये काम करतांना सुलभता व सुरक्षितता असावी या दृष्टीने म.रा.वि.वि.कंपनीतील उपकेंद्रामध्ये कार्यरत असलेल्या यंत्रचालकांना 'रेनसूट' व 'गमबूट' पुरविण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

३. या संदर्भात सर्वंकष विचार करुन व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनियम करुन महावितरण कंपनीतील उपकेंद्रामध्ये काम करणाऱ्या यंत्रचालकांना 'रेनसूट' व 'गमबूट' खरेदीच्या प्रतिपूर्तीस मंजूरी दिली आहे.

४. यानुसार महावितरण कंपनीतील उपकेंद्रांत कार्यरत असलेले कनिष्ठ यंत्रचालक, सहाय्यक यंत्रचालक व यंत्रचालक हे 'रेनसूट' व 'गमबूट' करिता निम्ननिर्देशित दराने कमाल अथवा प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यातील **किमान** खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र राहतील.

**१) रेनसूट - रु.५५०/- (रुपये पाचशे पन्नास) पर्यंत**
**२) गमबूट - रु.३५०/- (रुपये तीनशे पन्नास) पर्यंत**

५. 'रेनसूट' व 'गमबूट' हे २ (दोन) वर्षाच्या प्रत्येक गटवर्षाकरिता द्यावयाचा असून चालू गटवर्ष २००६-२००८ असे धरले जावे.

६. प्रशासकीय परिपत्रक क्र.६२ दिनांक ०५.०७.२००६ मधील सर्व सूचना अबाधित रहातील.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि. वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु.य.पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादितच्या विभागीय कार्यालय व त्यावरील सर्व स्तरापर्यंत.